महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०० वे | दिनांक : २८/१०/२०२६ | वार : बुधवार

## मराठवाडा पदवीधर निवडणुकीत आपणच जिंकणार : प्रतापसिंह पाटील



**छत्रपती संभाजीनगर :** विधान परिषदेच्या मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी सध्या सुरू असून, निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट) उमेदवार प्रतापसिंह पाटील यांनी आपल्या विजयाचा भक्कम विश्वास व्यक्त केला आहे. "आमचे परफेक्ट नियोजन होते आणि कार्यक्रम करेक्ट झालेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत आपणच आमदार होणार," असा मोठा दावा पाटील यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. प्रतापसिंह पाटील यांनी मतदारांचे आभार मानले. "आमचे नियोजन अतिशय अचूक होते. ही निवडणूक आम्ही नाही, तर थेट आम जनतेने आणि सर्व मतदारसंघांतील पदवीधरांनीच हातात घेतली होती. त्यामुळे आमच्यासाठी ही निवडणूक अतिशय सोपी गेली. सर्वांनी आम्हाला भरभरून पाठिंबा दिला आहे," असे ते म्हणाले. आपल्या उमेदवारीबद्दल बोलताना ते म्हणाले, "पहिल्या दिवसापासूनच सगळ्या लोकांनी मला पाठिंबा दिला, कारण त्यांना उमेदवार आवडला. लोकशाहीत मतदानाला सर्वात जास्त महत्त्व असते. पदवीधरांनी केवळ पक्षावर नाही, तर लोकशाहीवर निष्ठा ठेवून विचारपूर्वक मला मतदान केले आहे."मतमोजणीच्या निकालाबाबत उत्सुकता वाढवताना पाटील म्हणाले, "उमेदवार आवडला म्हणूनच मला मतदान झाले आहे. लोकशाहीवर निष्ठा ठेवून हे काम झाले आहे. आता तुम्हाला जास्त वेळ वाट पाहावी लागणार नाही, सायंकाळी सहा वाजेपर्यंत निकाल काय आहे, ते सर्वांना कळेलच.“ मराठवाडा पदवीधर मतदारसंघात यंदा अत्यंत चुरशीची आणि तिरंगी लढत पाहायला मिळत आहे. महायुतीकडून सतीश चव्हाण (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) रिंगणात आहेत, तर महाविकास आघाडीकडून प्रतापसिंह पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट) नशीब आजमावत आहेत. यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार दिलीप घुगे यांच्या उमेदवारीमुळे ही लढत अधिकच रंजक झाली आहे. कुणाला फटका बसणार आणि प्रतापसिंह पाटील यांचा दावा खरा ठरणार का, हे सायंकाळपर्यंत स्पष्ट होईल.

## जरांगेंनी राजकीय पक्ष काढावा : प्रताप सरनाईक



**मुंबई :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी 500 कोटींच्या कथित क्लिपचा मुद्दा उपस्थित केल्याने राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. यावरून महायुतीतील भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू असून, दोन्ही बाजूंनी जरांगे यांच्यावरही टीका केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर, शिंदे गटाचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मनोज जरांगे यांना थेट राजकीय पक्ष स्थापन करण्याचा खोचक सल्ला दिला असून, ते जाणीवपूर्वक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत असल्याचा आरोपही सरनाईक यांनी केला आहे. प्रताप सरनाईक म्हणाले, मराठा समाजाला सर्वाधिक न्याय जर कोणी दिला असेल तर तो एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. एखादा राजकीय नेता जसजसा मोठा होत जातो तसतसे त्याच्यावर टीका होत जाते. मनोज जरांगे हे जाणीवपूर्वक एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत आहेत, त्यांनी एखादा पक्ष स्थापन करावा, असा खोचक सल्ला सरनाईक यांनी दिला आहे. काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे यांनी एक ऑडिओ क्लिप उघड केली होती, ज्यामध्ये श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे यांना 500 कोटी रुपये दिल्याचे म्हटले आहे. यावरून जरांगे यांनी राज्य सरकार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका करत, हे 500 कोटी रुपये नेमके कुठे गेले, असा थेट सवाल उपस्थित केला. जरांगे यांच्या या आरोपानंतर शिंदे गटाचे नेते आक्रमक झाले असून त्यांनी बचावात्मक पवित्रा घेत थेट मनोज जरांगे यांच्यावरच पलटवार करण्यास सुरुवात केली आहे. प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणावर बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले, प्रदीप पूर्णेकर हत्या ही राजकीय कारकीर्दीतील निर्घुण हत्या आहे. सरकारने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. परंतु, या राजकीय हत्येचा वापर काही जणांकडून स्वतःच्या फायद्यासाठी केला जात आहे. राजकीय परिस्थितीमुळे एकनाथ शिंदे हे पूर्णेकरांच्या घरी गेले नाहीत, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. **एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी आणि त्यांना सणापूर्वीच वेतन मिळावे, यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश आले असून, शासनाने एसटी महामंडळाला सप्टेंबर 2026 मधील प्रवासी सवलत मूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी 391 कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी वेतन देण्याचा प्रशासनाचा शब्द पाळला जाणार असून, एसटीच्या हजारो कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## '६ लाख झाडे तोडून प्रकल्प ग्रीन कसा?' आदित्य ठाकरेंचा सरकारला सवाल

**मुंबई :** सह्याद्री परिसरातील प्रस्तावित वीजप्रकल्प, त्यासाठी होणारी वृक्षतोड आणि पर्यावरणाच्या संभाव्य हानीवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारवर जोरदार टीका केली. प्रकल्पातून किती वीज निर्माण होणार, प्रत्यक्षात किती रोजगार उपलब्ध होणार आणि पर्यावरणाचे किती नुकसान होणार, याबाबत सरकारने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच सह्याद्री परिसराचीच प्रकल्पासाठी निवड का करण्यात आली, गुजरातच्या कंपनीला येथे काम का देण्यात आले आणि स्थानिक आदिवासींच्या भविष्याबाबत सरकारची भूमिका काय आहे, असे सवालही त्यांनी उपस्थित केले. पत्रकार परिषदेत बोलताना आदित्य ठाकरे यांनी प्रकल्पाच्या क्षमतेबाबत सरकारकडून वेगवेगळे आकडे सांगितले जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. मुख्यमंत्री ५,००० मेगावॅट, तर अन्य व्यक्ती १२,००० आणि २०,००० मेगावॅट असे आकडे सांगत असल्याचे नमूद करत, सरकारने नेमकी किती वीजनिर्मिती होणार आहे, हे स्पष्ट करावे, असे ते म्हणाले. प्रकल्पामुळे हजारो रोजगार निर्माण होणार असल्याचे दावे केले जात असल्यावरही आदित्य ठाकरे यांनी आक्षेप घेतला. त्यांच्या म्हणण्यानुसार, पंप स्टोरेज प्रकल्प सुरू झाल्यानंतर कायमस्वरूपी रोजगाराची संख्या मर्यादित असते. अशा प्रकल्पात देखभाल, दुरुस्ती आणि टर्बाइन सुरू-बंद करण्यासाठी मोजके कर्मचारी आवश्यक असतात. बांधकामाच्या काळातील रोजगार आणि प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या नोकऱ्या या वेगवेगळ्या बाबी आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकल्पातून प्रत्यक्षात ५० ते ६० कायमस्वरूपी नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे हजारो नोकऱ्या निर्माण होणार असल्याचे सांगण्यापूर्वी सरकारने रोजगाराचे वास्तव स्पष्ट करावे, असे ते म्हणाले. गुंतवणुकीच्या मुद्द्यावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. देशातील कंपनी देशातच गुंतवणूक करत असेल, तर ती चांगली बाब आहे; मात्र ही गुंतवणूक नेमकी महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला किती फायदा देणार आणि किती रक्कम प्रकल्पाच्या उभारणीसह देखभाल-दुरुस्तीवर खर्च होणार, याची माहिती समोर आली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ ऑक्टोबर २०२६

## काळा मारुती देवस्थान येथे कोजागिरी पोर्णिमा निमित्त विविध कार्यक्रम



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील प्रथम व प्रसिद्ध श्रीकाळा मारुती मंदिर संस्थान कारमाथा येथे भव्य कोजागिरी पौर्णिमा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी श्री.ह.भ.प.संतोष महाराज आढावणे यांचे सुश्राव्य कीर्तन झाले, कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाराजांनी देहुडा चरणी वाजवितो वेणू । गोपिका रमणू स्वामी माझा!! हा अभंग सेवेकरता निवडला होता, महाराजांनी सांगितले की, शरद पौर्णिमेला वृंदावनामध्ये भगवान श्रीकृष्णांनी गोपिकांसमवेत महारासक्रीडा केली होती. म्हणून तेव्हापासून चंद्रामृत सेवन करण्याची परंपरा आहे. कोजागिरी चा पुर्ण चंद्र हे चारित्र्य, ज्ञान प्रकाशाचे प्रतिक असुन जीवनात सतत जागरुक राहण्याची शिकवण देतो. पौर्णिमा उत्सवाच्या या आनंदमय वातावरणात पंचक्रोशीतील शेकडो भाविक याप्रसंगी प्रचंड संख्येने उपस्थित होते. भाविकांकरिता महाप्रसादाचे आणि दीड हजार लिटर दुधाचे भव्य प्रमाणात आयोजन केलेले होते. श्री काळा मारुती मंदिर संस्थान हे कन्नड तालुक्यातील प्रथम आणि दुर्मिळ देवस्थान असल्याकारणाने परिसराची अतूट श्रद्धा या देवस्थानावर आहे. दरवर्षी हजारो भाविक येथे भेट देतात. भव्य अखंड हरिनाम सप्ताह, श्रीहनुमान जयंती, गुरुपौर्णिमा, कोजागिरी पौर्णिमा असे विविध कार्यक्रम या संस्थानवर राबवले जातात. यावेळी प्रचंड जनसमुदाय उदंड प्रतिसादाने उपस्थित असतो. या संस्थांचे महंत श्री उद्धवजी बापू महाराज राऊत, यांच्या सुंदर नियोजनात हे संस्थान कार्यरत आहे. तसेच प्रत्येक शनिवारी श्रीमारुतीरायांचा महाअभिषेक केला जातो. संस्थानवर होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमासाठी भाविकांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन यावेळी महाराजांनी केले.

## दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा फी सरसकट माफ करा




**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागासह शहरांमध्ये मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय कर्मचाऱ्यांची पाल्ये वगळून दहावी आणि बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा फी कोणत्याही अटीशर्तीशिवाय सरसकट माफ करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राज्य महासचिव प्रा. देवानंद वानखेडे व राज्य सह सचिव प्रा. अवद चाऊस यांच्या वतीने करण्यात आली आहे. शासनाने राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असल्याचा उल्लेख मागणीपत्रात करण्यात आला आहे. दुष्काळामुळे ग्रामीण भागातील पालकांची आर्थिक परिस्थिती खालावली असून, त्याचा परिणाम त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणावरही होत आहे. शहरांमध्ये मोलमजुरी करणारे अनेक पालक मूळचे ग्रामीण भागातील आहेत. मात्र, ते मागील १५ ते २० वर्षांपासून शहरात वास्तव्यास असल्याने त्यांच्याकडे गावाकडील जमीन किंवा ग्रामीण वास्तव्याचे पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अशा कुटुंबांनाही दुष्काळाचा फटका बसत असताना सवलतीपासून वंचित राहावे लागू शकते, असे मागणीपत्रात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना दिलासा मिळावा यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांची पाल्ये वगळून दहावी व बारावीच्या परीक्षार्थींची परीक्षा फी सरसकट माफ करावी आणि त्याबाबत शासनाने तातडीने आदेश काढावेत, अशी विनंती करण्यात आली आहे.

# जलसंधारणाची विविध कामे हाच शाश्वत विकासाचा पाया



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील कलदेव लिंबाळा येथील दुष्काळातही आजघडीला शेततळ्यात 8 फूट पाणी आढळून आले.त्यामुळे आंब्यासह विविध फळबागांना जीवनदान मिळाले आहे.शिवारातील पाहणी दरम्यान त्या बोलत होत्या.गावसमितीच्या सचिव आणि ग्रामपंचायत गटनेत्या पुढे म्हणाल्या की,"जलसंधारणाची विविध कामे हीच गावाच्या शाश्वत विकासाची खरी पायाभरणी आहे. केवळ रस्ते, बांधकामे करून गावांची नुसतीच रंगरंगोटी करणे हा गावचा विकास नसून पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून जमिनीत मुरवल्यास शेतकऱ्यांचे व गावांचे आर्थिक स्थैर्य व जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होईल." .कलदेव निंबाळा येथील जलसंधारणाच्या कामांची तालुक्यातील शेतकऱ्यांकडून नुकतीच पाहणी करण्यात आली. पावसाने पाठ फिरवली, दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली, तरी योग्य नियोजनातून केलेल्या जलसंधारणाच्या कामांमुळे शेतीला पाण्याचा आधार मिळू शकतो, याचा प्रत्यय कलदेव निंबाळा येथील शिवारात पाहायला मिळत आहे. वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या सहकार्याने आणि शेतकऱ्यांच्या लोकसहभागातून उभारलेल्या शेततळ्यात आजही 8 फूट पाणी उपलब्ध असून, त्याच्या मदतीने युवा शेतकरी अक्षय डोणगावे आपल्या फळबागा जगवत आहेत. या जलसंधारणाच्या कामांची माहिती घेण्यासाठी तालुक्यातील पाच सहा गावांतील शेतकऱ्यांनी कलदेव निंबाळा येथे पहाणीअभ्यासभेट देऊन समाधान व्यक्त केले.युवा शेतकरी अक्षय डोणगावे यांनी आपल्या शेतातील उताराच्या भागात ३० मीटर लांब, ३० मीटर रुंद आणि 4 मीटर खोल शेततळे वॉटरशेड संस्थेच्या सहकार्याने व स्वतःच्या लोकवाट्यातून तयार केले आहे. उताराला शेततळे केल्याने वरील जमिनीचे सर्व पाणी जिरपून व वाहत घेऊन यात साठले आहे. या पावसाचे पाणी साठवून आता अडचणीच्या काळात त्याचा शेतीसाठी योग्य वापर करण्याच्या उद्देशाने उभारलेल्या या शेततळ्यात सध्याच्या दुष्काळी परिस्थितीतही 8 फूट पाणी शिल्लक आहे. सौरऊर्जेवरील पंप आणि ठिबक सिंचनाच्या माध्यमातून ते आपल्या आंबा, पेरू व बोरांच्या फळबागांना पाणी देत आहेत. त्यामुळे पाणीटंचाईच्या काळातही फळबागा जगविण्यास मदत होत आहे.जलसंधारणातून पाण्याची शाश्वत उपलब्धतावॉटरशेड संस्थेच्या माध्यमातून कलदेव निंबाळा परिसरात सिमेंट बंधारे, मातीचे बांध, शेततळी, नाला खोलीकरण, सिमेंट नाला बांध, दगडी बांध, बांधबंदिस्ती आदी विविध जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे आणि भूजलपातळी वाढविणे, हा या कामांचा मुख्य उद्देश आहे. या प्रयत्नांमुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरींच्या पाणीपातळीत वाढ होण्यास मदत झाली असून, उपलब्ध पाण्याच्या आधारावर शेती आणि फळबागांचे संगोपन करणे शक्य झाले आहे.शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या कामांचा आदर्श घ्यावाअभ्यासभेटीदरम्यान आयोजित बैठकीत देविदास पावशेरे यांनी वॉटरशेड संस्थेच्या माध्यमातून गावात राबविण्यात आलेल्या जलसंधारण व कृषीविषयक कामांची माहिती दिली. संस्थेच्या सहकार्याबद्दल आभारजलसंधारणाची विविध कामे हाच शाश्वत विकासाचा पाया आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून अशा कामांना प्राधान्य द्यावे."या अभ्यासभेटीत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी शेततळे, फळबागा आणि परिसरातील जलसंधारणाच्या कामांची पाहणी करून माहिती घेतली. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने साठविल्यास दुष्काळी परिस्थितीतही शेतीला आधार मिळू शकतो, याची जाणीव या भेटीतून झाली.यावेळी ग्राम विकास समिती च्या सचिव सुनिता पावशेरे,वॉटरशेड संस्थेचे खंडू पांढरे, अनिल जाधव, चंदाराणी टेकाळे, विठ्ठल ढवळे , वसुंधरा सेवक गहिनीनाथ बिराजदार यांच्यासह शेतकरी व नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.पावसाचा प्रत्येक थेंब अडवून जमिनीत मुरविणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि लोकसहभागातून जलसंधारणाची कामे उभारणे, यातूनच शेती, शेतकरी आणि गावाचा शाश्वत विकास साधता येतो, हा सकारात्मक संदेश कलदेव निंबाळा येथील कामांनी दिला आहे. "आम्ही माळरानावर लावलेली विविध फळबाग केवळ या शेततळ्यामुळे जिवंत राहणार आहे. त्यामुळे मला याचा दुष्काळी परिस्थितीत खूप मोठा फायदा झाला आहे". -अक्षय डोणगावे, युवा शेतकरी

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**

**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**

**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ ऑक्टोबर २०२६


## देवस्थान इनाम जमिनी खालसा करण्यासाठी १ नोव्हेंबरला छत्रपती संभाजीनगरात आक्रोश मेळावा

**छत्रपती संभाजीनगर** - देवस्थान इनाम जमिनी खालसा करून सर्व देवस्थान इनाम धारक शेतकऱ्यांना न्याय मिळावा या मागणीसाठी राज्यभर मोठे आंदोलन उभे राहिले आहे. या आंदोलनात सर्व समाजातील इनामधारकांचे मोठे योगदान आहे. इनामधारक शेतकऱ्यांच्या हक्कासाठी परशुराम हिंदू सेवा संघ, महाराष्ट्र व देवस्थान इनाम जमीन कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भव्य "आक्रोश मेळाव्याचे" आयोजन करण्यात आले आहे.हा मेळावा दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता साखरे मंगल कार्यालय, एन-८, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.या मेळाव्यास परशुराम हिंदू सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री अनिल मुळे, प्रदेशाध्यक्ष मा. श्री विश्वजीत देशपांडे, अखिल गुरव समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री अण्णासाहेब शिंदे, दशनाम गिरी गोसावी समाज संघटनेचे अध्यक्ष मा. श्री ओम प्रकाश गिरी, मराठवाडा इनाम हक्क परिषदेचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र बन, ॲड. रविराज जोशी, ॲड. स्वप्निल देशमुख, सुनील कुलकर्णी, अरविंद कुलकर्णी, मराठवाडा प्रमुख गजानन जोशी रोशनगावकर यांच्यासह राज्यभरातील प्रमुख पदाधिकारी व इनामधारक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.देवस्थान इनाम जमिनींचा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित असून, हजारो शेतकरी कुटुंबे या जमिनी कसूनही त्यांच्या नावावर सातबारा होत नसल्याने अडचणीत आहेत. शासनाने या जमिनी खालसा करून कसणाऱ्या इनामधारकांच्या नावावर कराव्यात, ही प्रमुख मागणी या मेळाव्यात करण्यात येणार आहे. तरी सर्व इनामधारक शेतकऱ्यांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन परशुराम हिंदू सेवा संघ व देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## गझल ही वेदनेवर घातलेली फुंकर असते-गिरीश जोशी



**छत्रपती संभाजीनगर :** जीवन विकास ग्रंथालयाच्या वाचक व्यासपीठचा दहावा साहित्यिक संवाद सोमवारी संपन्न झाला. याप्रसंगी बोलताना कवी गझलकार गिरीश जोशी म्हणाले, 'मला या शहराने घडवले आहे. कवितेने माझे बोट पकडून मला गझलेच्या स्वाधीन केले. मन मोकळं करण्यासाठी मी लिहितो, गझल मला प्रवाही ठेवते. माझी गझल माणुसकीचा शोध घेते.' कार्यक्रमाच्या प्रारंभी गझलकार गिरीश जोशी आणि गझलकार रमेश ठोंबरे यांचे स्वागत प्राचार्य जीवन देसाई आणि डॉ. राजशेखर बालेकर यांनी केले. डॉ. विनोद सिनकर यांनी प्रास्ताविकातून गिरीश जोशी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आणि वाचक व्यासपीठ संकल्पना स्पष्ट केली. 'मी दिवा विझवला नाही' या गिरीश जोशी यांच्या नव्या गझलसंग्रहाबद्दल रमेश ठोंबरे यांनी आपले विचार मांडले. गिरीश जोशी यांनी आपला काव्य प्रवास सांगताना उपस्थित रसिकांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी कवी सुहास महाजन, रश्मी देशपांडे, श्रीकांत उमरीकर, जीवन देसाई आदींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. वाचक व्यासपीठाच्या या दहाव्या बैठकीस कवी सुनील उबाळे, डॉ. पांगरेकर, नृसिंह कुलकर्णी, सौ. संगीता मंडलिक, सौ. सुरेखा काणे, देवीदास देशपांडे,ऋषभ कुलकर्णी, डॉ. गणेश कुलकर्णी, कल्याणी कोळपकर, गुलाबराव मगर, सुनील वायाळ, विश्वनाथ ससे, श्री. व सौ. चिमणपुरे , श्री व सौ. किनगावकर, चंद्रकांत जोशी यांच्यासह रसिकाश्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद सिनकर यांनी केले, तर श्रीकांत उमरीकर यांनी आभार मानले.

## घारीची भरारी

तपकिरी रंगाची घार
आकाशी घेते भरारी
निळ्या नभाच्या अंगणात
सुंदर दिसते न्यारी

अतिशय तीक्ष्ण डोळ्यांनी
जमिनीवरील टिपते हालचाली
सावज तिला दिसता
लगबगीने येते खाली

पंख न हलवता
स्थीर राहते आकाशी
अशी कोणती जादू
निसर्गाने दिली तिजपाशी

पिल्लांसाठी घरटे बांधले
उंच झाडावर घार
गवत, कापडाच्या तुकड्यांनी
बनविते छान उबदार

मृत प्राण्यांना खाऊन
पर्यावरण स्वच्छ ठेवते
सफाई कामगार म्हणून
सर्वांना ती भावते



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**






## राज ठाकरेंनी फोनवरून पोस्ट हटवली; सुजात आंबेडकरांचा आरोप

**वाशिम :** भाजप आणि काँग्रेसचे लोक ५०० रुपये घेऊन सोशल मीडियावर पोस्ट करतात, कमेंट करतात आणि इतरांना ट्रोल करतात. पण आता एक नवीन पॅटर्न समोर आला आहे. मुंबईतील एक मोठे नेते राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली होती. मात्र, मुंबई पोलिसांच्या किंवा गौतम अदानी यांच्या कार्यालयातून फोन आल्यानंतर राज ठाकरेंना ती पोस्ट डिलीट करावी लागली. सोशल मीडियावर पोस्ट टाकण्यासाठी ५०० रुपये मिळतात हे मला माहीत होते, पण पोस्ट डिलीट करण्यासाठी सुद्धा वेगळे पैसे मिळतात, हे त्यांच्यामार्फत समजले, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी केला आहे. सुजात आंबेडकर म्हणाले की, राज ठाकरे यांनी मनपा निवडणुकीच्या वेळी एक आघाडी तयार केली होती. त्या आघाडीपासून आपण सावध राहिले पाहिजे. या आघाडीमध्ये उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट सहभागी होते. या आघाडीच्या लोकांनी गुजराती उद्योजकांच्या विरोधात काम केले, मात्र याच राज ठाकरेंचे गौतम अदानी यांच्या घरी जाणे-येणे असते. धारावीचा प्रकल्प अदानींना कसा देता येईल, यासाठी ठाकरे परिवार काम करतो. हीच लोकं गणपतीच्या काळात एकमेकांच्या घरी जातात. अदानी आणि अंबानी यांना वाचवण्यासाठी उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि शरद पवार हे नेहमी पुढे असतात, अशी टीकाही त्यांनी केली. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, राज्यात सध्या गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, दिवाळीनंतर ही परिस्थिती आणखी खराब होणार आहे. हे आरएसएसचे लोक सत्तेत बसले आहेत, त्यांनी देवाच्या आणि हिंदूंच्या नावावर मते मागून सत्ता मिळवली आहे. सरकारने पिण्याच्या पाण्याची आणि अन्नधान्याची योग्य व्यवस्था केली नाही, तर आरएसएसचे जिल्हाप्रमुख आणि भाजपच्या जिल्हाप्रमुखांच्या घरासमोर आम्ही रांगेत उभे राहून जेवण आणि पाण्याच्या मागणीसाठी तीव्र आंदोलन करू, असा इशारा प्रकाश आंबेडकरांनी दिला.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ ऑक्टोबर २०२६


# उमरग्यात काव्यांगणचे कविसंमलेन रंगले



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील लोट्स पोदार इंग्लिश स्कूलच्या सभागृहात नुकतेच काव्यांगण साहित्य मंच यांच्या वतीने आयोजित केलेले दुसरे राज्यस्तरीय कविसंमेलन थाटामाटात संपन्न झाले. यात महाराष्ट्रातून साठहून अधिक कवी सहभागी झाले होते.राज्यस्तरातून आलेल्या या कवींनी विविध विषयावर अत्यंत मर्मभेदी व आशयपूर्ण कविता सादर केल्या.आज महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या विविध कवींनी विविध विषयावरच्या तब्बल ६० कविता सादर करीत सारे सभागृहच भारावून टाकले.स्वरचित मराठी कवितांची एक बहारदार मैफल पुन्हा एकदा उमरगेकरांनी अनुभवली. "शब्द नवे ,अर्थ नवे ,कवितांचा हा विश्वासोहळा" ही संकल्पना घेऊन सातत्याने काव्यांगण साहित्य मंचाचे अध्यक्ष काव्यप्रेमी मा. विकास राठोड यांनी या अनुभूती सोहळ्याचे आगळे वेगळे आयोजन करण्यात आले होते. नाती जोडू प्रेमाची हा संदेश महाराष्ट्रातील गावागावात पोहचविण्यासाठी दरवर्षी या काव्यसंमेलन सोहळ्याचे आयोजन केले जाते.याचबरोबर एक प्रातिनिधिक कवींच्या कविता एकत्र करून प्रातिनिधिक स्वरूपाचा एक कवितासंग्रह काढला जातो आणि ओपन माईक या कार्यक्रमात त्याचे सर्वांच्या सहकार्याने भव्य असे प्रकाशन केले जाते.सुरुवातीला या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष अहिल्यानगरचे सुप्रसिद्ध कवी सुभाष सानवणे ,उद्घाटक प्रा.दिलीप पवार ,स्वागताध्यक्ष प्राचार्य बी.पी.सिंग,प्रमुख पाहुणे भूमिपुत्र वाघ, सुवर्णा ताई पवार ,डॉ.संजय राठोड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या कविसंमेलन व साहित्यसोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी प्रसिद्ध साहित्यिक के.व्ही.सरवदे,दिलीप कांबळे, आनंदा साळवे,भाग्यश्री देवकाते,शमशाद जावेद पटेल,मंगल बोराडे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे देखणे सूत्रसंचालन गझलकार रज्जाक शेख व अयान मौजान यांनी अत्यंत खुमासदार पद्धतीने केले,प्रमुख उद्घाटक प्रा.दिलीप पवार यांनी विकास राठोड यांनी सुरू केलेल्या साहित्यिक उपक्रमाबद्दल कौतुक करून यात सातत्य ठेवण्याचे आवाहन केले. संमेलनाचे औपचारिक उद्घाटन झाल्याचे सांगितले.अशा दुष्कर परिस्थितीतही कवी संमेलन आयोजित करणे हे फार मोठे धारिष्ट्याचे काम आहे.कविता ही त्यात्या व्यक्तींच्या प्रकृतीनुसार जन्माला येत असते.आपल्या मनातील भावना शब्दबद्धः करणे हे सगळ्यांना जमत नसते,त्यासाठी कवी आणि रसिक या दोहोंकडे कल्पनाशक्ती असायला हवी.कविता प्रत्येकाच्या मनात असते पण ती मुखर होत नाही,अव्यक्त स्वरूपात ती मनात रुंजी घालत असते अशा अव्यक्त मनांना अभिव्यक्त होण्यासाठी काव्यांगण साहित्य मंच आहे असे सांगून विकास राठोड यांनी प्रास्ताविक केले,त्यानंतर भूमिपुत्र वाघ,सुवर्णा पवार व सुभाष सोनवणे यांची समुचित भाषणे झाली आणि मग नाती जोडू प्रेमाची या बहारदार कविसंमेलनाला सुरुवात झाली. आनंदा साळवे यांच्या "या झोपडीत माझ्या मी एकटीच होते" ,किशोर पांचाळ यांची "आबासाहेब" ,युवराज बिराजदार आणि डॉ.वर्षाराणी मुस्कटवाड यांच्या दुष्काळावरच्या कविता,राजेंद्र महल्ले यांची "संसाराचा गाडा हिंमतीने लोटत नेला " ,गौतम कोकरे "शेवटी स्वप्नांची झाली माती " ,नर्मदा गोपाल गायकवाड यांची "कोरडी पडली काळी माय", किशोर देवसाळे यांची "कांहीं ओलावलेली पाने " ,सुभाष चव्हाण यांची "झुळझुळ पाणी ", वैशाली गायकवाड यांची "नवयुग की पहेचान",रशीद शेख यांची "झाडे लावा पाऊस आना " भावना गांधिले यांची श्रीकृष्णावरची कविता,अश्विनी धोत्रे यांची "कार्याचे रंग दिव्याचे सांग" मुक्तेश्वर मुळे यांची होय रोज तुम्ही परत यायची वेळ आली आहे अशा एकापेक्षा एक सरस कवितांची मेजवानी रसिकांना ऐकायला मिळाली.प्रेमाच्या ,विरहाच्या,हास्याच्या आणि चालू असलेल्या दुष्कर दुष्काळाच्या गंभीर कविताही ऐकावयास मिळाल्या.या संमेलनाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.लहान ,मोठे मुली ,महिला यांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद आणि महिलां कवयित्रींची संख्या वाखाणण्याजोगी होती. अनेक वर्षापासून काव्यांगण साहित्य मंचाचे संस्थापक अध्यक्ष मा. विकास राठोड यांनी उमरगा आणि पंचक्रोशीत साहित्यिक चळवळ अत्यंत तळमळीने आणि मोठ्या उत्साहाने सुरुवात केली आहे.साहित्य हा समाजाचा आरसा आहे, समाजाचे वास्तव हे साहित्यातून प्रतिबिंबित होत असते. कविता म्हणजे मानवी मनाचा भावनात्मक असा अविष्कार असतो. कवीची कल्पनाशक्ती प्रतिभा आणि भावनात्मक अविष्कार यातून समाजातले, निसर्गातले आणि आपल्या मनातले उत्स्फूर्त वास्तव कविता या साहित्य प्रकारातून चित्रित होत असते. कवीने पाहिलेले ,अनुभवलेले समकालीन सामाजिक जीवन निसर्ग सौंदर्य, मानवी वृत्ती प्रवृत्ती ,मानवी व्यथा, वेदना संघर्ष आणि जीवन जाणिवांची ओळख, शब्दरूपाने कवी काव्य स्वरूपात मांडत असतो. आपल्या हळुवार भावनांना शब्दबध्द करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विकास राठोड यांनी असेच उत्तरोत्तर कार्य करून नवोदितांना संधी द्यावी व त्यांच्या प्रतिभेला न्याय मिळवून द्यावा अशी अनेक कवी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कविसंमेलनात राजेंद्र महल्ले, गौतम कोकरे, रशीद शादौ, रविराज राठोड, वैशाली गायकवाड, चंदा कौसाडीकर, सुमन पवार, चंद्रकांत गुंडरे, पंढरी बनसोडे, आरती महेकर, दत्तात्रय इंगळे, बुध्दकन्या भालेराव, सुनील राठोड, रज्जाक शेख, आनंदा साळवे, लक्ष्मी बिरादार, निशा जमादार, सुजित पाटील, शगुफ्ता इनामदार, किशोर पांचाळ, मदन जवळगेकर, विजयकुमार सोनवणे, दस्तगीर जमादार, संस्कृती कांबळे, श्रुती चौधरी, मुक्तेश्वर मुळे, वर्षराणी मुस्कटवाड, अर्चना मठपती, जमलोद्दीन शेख, मिलिंद आहेर, जावेद शेख, श्रद्धा मगर, सुभाष चव्हाण , सागर गुरव , प्रकाश महामुनी, जयश्री जगताप, अमेय मुळे, किशोद देवतळे, कौसवी लोंढे, काकासाहेब कांबळे, गिरीश तुळजापुरे, सई शिंदे, स्वप्नील कांबळे, युवराज बिराजदार, कांचन कांबळे, अशोक चव्हाण, प्रमोद बनसोडे, भावना गांधीले, विजय सागर आणि सय्यद कासीम असे महाराष्ट्रातील सर्वदूर परिसरातून कवी ,कवयत्री उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.सर्व सहभागी कवींना काव्यांगण साहित्य समूहातर्फे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.त्याचबरोबर साहित्याच्या ,समाजाच्या आणि शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या साहित्य कलावंत यांना त्यांच्या कार्याचा परिघ आणखी वाढविण्यासाठी काव्यांगण साहित्य मंचातर्फे विविध पुरस्कार देण्यात आले.त्यात यावर्षीचा काव्यदीप पुरस्कार २०२६डॉ.स्वाती खंदारे, पुणे यांना तर ॲड. दिलीप कांबळे, धाराशिव(आदर्श समाजसेवक पुरस्कार2026),सुभाष चव्हाण, धाराशिव(आदर्श शिक्षक पुरस्कार..2026),मंगल बोराडे, तुळजापूर(उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार 2026),सुदर्शन जोशी, धाराशिव, (उत्कृष्ट निवेदक पुरस्कार..2026)गौतम अंबादास बाकले, धाराशिव,(आदर्श समाजसेवक पुरस्कार 2026),भावना गांधीले, अहिल्यानगर,(आदर्श शिक्षिका पुरस्कार2026),वर्षा ननवरे, इंदापूर,(काव्यदीप पुरस्कार 2026),अमेय मुळे, डोंबिवली(उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार 2026),शमशाद जावेद पटेल, सोलापूर(आदर्श शिक्षिका पुरस्कार 2026),रंजिता पवार, उमरगा (आदर्श समाजसेविका पुरस्कार 2026),भाग्यश्री देवकते (बाचके )उमरगा (उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार 2026),प्रा. निशा घोसले जमादार, लातूर (हिरकणी पुरस्कार 2026),मा.अनुराधा मारचट्टीवार, हैद्राबाद (रणरागिणी पुरस्कार 2026) असे एकूण बारा पुरस्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी काव्यांगण समूहाचे अध्यक्ष विकास राठोड, उपाध्यक्ष अयान मौजन, सचिव वृंदा गंभीर, सहसचिव स्नेहा जाधव आणि कोषाध्यक्ष सिद्धीविनायक शिंदे हे आवर्जून उपस्थित होते.अयान मौजन यांनी कार्यक्रमाचे सविस्तर आभार मानले आणि राष्ट्रगीतानंतर कविसंमेलनाची सांगता झाली.

# ५०० कोटींची क्लिप म्हणजे सत्ताधाऱ्यांतील भावकीचा वाद : सतेज पाटील

**कोल्हापूर :** "राज्यात आणि देशात सध्या 'एल निनो'चा तीव्र प्रभाव असून पावसाचे प्रमाण सातत्याने घटत चालले आहे. एका बाजूला संपूर्ण राज्य दुष्काळाच्या भीषण सावटाखाली होरपळत असताना, दुसऱ्या बाजूला ज्या वृक्षांमुळे पर्यावरणाचा समतोल टिकून राहतो, त्या झाडांची कर्जत-भीमाशंकर परिसरात सर्रास कत्तल करण्याचे काम राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू आहे. डेटा सेंटर आणि जलविद्युत प्रकल्पांसाठी कोट्यवधी लिटर पाणी वापरले जाणार आहे; मुळात पाणीच उपलब्ध नसताना अशा दुष्काळी परिस्थितीत निसर्गाचा ऱ्हास करणारे प्रकल्प राबवणे किती संयुक्तिक आहे, याचा विचार सरकारने आधी करावा," असा सवाल काँग्रेसचे नेते सतेज (बंटी) पाटील यांनी उपस्थित केला आहे. कोल्हापुरात पत्रकारांशी संवाद साधताना सतेज पाटील यांनी कर्जत-भीमाशंकर प्रकल्पातील वृक्षतोड, मनोज जरांगे पाटील यांच्याशी संबंधित ऑडिओ क्लिप, गोकुळ दूध संघाची निवडणूक व अध्यक्ष निवडीची प्रक्रिया, तज्ज्ञ संचालकांची नियुक्ती आणि मतमोजणीतील त्रुटींवर रोखठोक मते मांडली. भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीवर आणि पाण्याच्या वापरावर तीव्र आक्षेप नोंदवत सतेज पाटील म्हणाले, "राज्यात आधीच तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी हजारो-लाखो झाडे तोडून पर्यावरण उद्ध्वस्त करणे अत्यंत दुर्दैवी आहे. हे प्रकार शासनाने तात्काळ थांबवले पाहिजेत.“ "प्रस्तावित प्रकल्पांसोबतच डेटा सेंटर्स मोठ्या प्रमाणावर येत असून त्यासाठी अथांग पाणी वापरले जाणार आहे. आधीच जनतेला पिण्यासाठी पाणी नाही, पाऊस नाही; मग हे प्रकल्प चालवण्यासाठी पाणी कुठून आणणार? त्यामुळे पर्यावरणाची राखरांगोळी करणारे उद्योग लादण्यापेक्षा सरकारने आधी पाण्याच्या संकटाचा गांभीर्याने विचार करावा.“ मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित 500 कोटींच्या ऑडिओ क्लिपवर बोलताना पाटील यांनी महायुतीतील अंतर्गत धुसफुस उघडी पाडली. "हा महायुतीतील दोन पक्षांमधील अंतर्गत 'भावकीचा वाद' आहे. जर मनोज जरांगे पाटील हे मुख्य टार्गेट असते, तर ही क्लिप आधीच बाहेर काढली असती. २ ते २.५ वर्षे जुनी ऑडिओ क्लिप नेमकी आताच बाहेर काढली जाते, याचा स्पष्ट अर्थ सत्ताधारी पक्षांमधील अंतर्गत मतभेद आता विकोपाला गेले आहेत.“ "सत्ताधाऱ्यांमधील वाद आता एकमेकांना बोलण्यापुरता मर्यादित न राहता, एकमेकांवर सर्व्हेलन्स (पाळत) ठेवणे आणि एकमेकांचे फोन रेकॉर्ड करण्याच्या थरापर्यंत जाऊन पोहोचला आहे. तसेच जरांगे यांच्याकडे पासपोर्ट आहे किंवा ते परदेशात गेले, अशा प्रकारचे आरोप करणे पूर्णपणे अप्रस्तुत व अवास्तव आहे.“ सहकारी संस्थांमधील शासकीय हस्तक्षेपावर आणि तज्ज्ञ संचालकांच्या नियमांवर त्यांनी भाष्य केले. "सध्या राज्यात १ तज्ज्ञ संचालक असतो, तो वाढवून कदाचित ३ ते ४ केले जातील आणि तिन्ही सत्ताधारी पक्षांना प्रत्येकी १ संचालक देऊन बोर्ड ३० ते ३३ सदस्यांचे करण्याचा प्रस्ताव असू शकतो. मात्र, मुख्यमंत्री या निर्णयात थेट हस्तक्षेप करणार नाहीत, कारण त्यांनाही जनतेचा जनादेश (मँडेट) ठाऊक आहे.“ "उद्या १५ लोक निवडून आले आणि १६ तज्ज्ञ संचालक नेमले, तर मग लोकशाही मार्गाने निवडून आलेल्यांच्या मताला काय अर्थ उरणार? तज्ज्ञ संचालकांना मताधिकार देण्याचा नियम केला तरी तो न्यायालयात आणि कायद्याच्या चौकटीत अजिबात टिकणार नाही. मतमोजणीच्या वेळी मतपेट्या सील नसल्याची माहिती समोर येत असेल, तर हे अत्यंत धक्कादायक आणि महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.